सरकारतर्फे साक्षीदार क्र.४ चा सरतपासः-
मी याद्वारे शपथेवर साक्ष देतो की,
माझे नावः - पो.ह. राहुल बबन यादव,
वय - ३६ वर्षे, धंदा - नोकरी,
नेमणूक - राहूरी पोलीस स्टेशन.
अभियोग पक्षातर्फे साक्षीदाराचा सरतपास सहा. सरकारी अभियोक्ता श्रीमती एम.के.सोनवणे यांचे मार्फत सुरुः-

दिनांक ०५/०८/२०२२ रोजी मी नेवासा पोलिस नाईक म्हणून कार्यरत होतो. सदर दिवशी पो.नि. क-हे यांनी पोलिस स्टेशनला बोलावून घेतले व त्यांनी कळवले की, हारून युनुस शेख रा. नाईकवाडीगल्ली, नेवासा खुर्द, ता. नेवासा याने तलवारीचा स्टेटस ठेवला असल्याने असे कळविल्याने व त्यास कारवाई करणेकामी घेऊन येण्यास कळविले. तेव्हा मी पो.ना.तमनर, पोलिस नाईक यादव, पो. कॉ.गुंजाळ पो.कॉ.पालवे असे नेवासा पोलिस स्टेशनला हजर होतो. त्यानंतर पो. ना. तमनर यांनी २ पंचाना पोलीस स्टेशनला बोलवून घेतले. पंचाना बातमीतील हकीगत समजावून सांगितली. त्यानंतर आम्ही आरोपीच्या घरी गेलो व त्यास स्टेटस दाखविले. त्यानंतर त्याने तलवार घेऊन पोलिस स्टेशनला येतो असे कळविले. त्यानंतर हरुन शेख हा नेवासा पोलीस स्टेशनला तलवार घेऊन हजर झाला. पो. ना. तमनर यांनी दोन पंचासमक्ष पंचनामा केला व तलवार जप्त केली. पो.कॉ. गुंजाळ यांनी फिर्याद दिली. तलवार मला दाखवल्यास मी ओळखू शकतो. आता मला जप्त तलवार एम.ओ.अ दाखविण्यात आली. ती तिच आहे. आरोपीला पाहिल्यास मी ओळखू शकतो. आरोपी आज रोजी न्यायालयात हजर आहे.

सरतपास पुर्ण.

उलटतपास आरोपी तर्फे विधीज्ञ जे.बी. इनामदार यांचेमार्फत सुरु-

२. मी ५ वर्षापासून नेवासा पोलिस स्टेशनला कार्यरत होतो. हे म्हणणे खरे आहे की, मला नेवाशातील बरेच लोक ओळखतात. आम्ही ज्या सरकारी वाहनाने गेलो त्याचा क्रमांक मला आठवत नाही. स्टेशन डायरीला नोंद केली होती किंवा कसे हे मला आठवत नाही. गुन्हा दाखल करतेवेळी स्टेशन डायरीला नोंद केली होती. आरोपी लोकवस्तीत राहतो. आरोपीच्या घराचा दरवाजा उत्तर दिशेस आहे. आरोपीस सुचना देऊन आम्ही परत आलो. हे म्हणणे खरे नाही की, मी सरतपासातील संपूर्ण मजकुर खोटा सांगितला. आरोपी शांतता कमिटीचा सदस्य आहे किंवा कसे हे मला सांगता येणार नाही. आरोपीचे शांतता कमिटीच्या कामासाठी नेवासा पोलिस स्टेशनला येणे-जाणे चालू असते किंवा कसे हे मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी शांतता कमिटीचा सदस्य असल्याने त्याचे व पोलिस स्टेशनचे वाद होतात. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीला खोटया गुन्हयात अडकवले आहे.

पंचाची पूर्ण नावे मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पुर्ण. फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृती,

सही/-
(ए.एन.सरक)
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, न्यायालय क्र.३,
नेवासा.

दिनांक- ०८/१२/२०२५.